# संशोधक

वर्ष : ९२ • मार्च २०२४ • पुरवणी विशेषांक ०८




प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

॥ श्री विश्वनाथो विजयते ॥

स्थापना : ९ जानेवारी १९२७

Scanned with OKEN Scanner

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

**पुरवणी अंक ८ – मार्च २०२४ (त्रैमासिक)**

- शके १९४५
- वर्ष : ९२
- पुरवणी अंक : ८

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे
- डॉ. एस. व्ही. पणदे
- डॉ. बी. एम. मगदूम

**✷ प्रकाशक ✷**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-

वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

Scanned with OKEN Scanner

ISSN No. 2394-5990


६१. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीमुक्तीतील योगदान**

– डॉ. काशिनाथ जगन्नाथ सोलनकर ---------------------------------------- २६४

६२. **महिला सक्षमीकरणा मध्ये 'मदर इंडिया' चित्रपटाचे योगदान**

– १) गडगे शांता रंगनाथ २) डॉ. के.एम. अंबाडे ------------------------------ २६७

६३. **सांख्यिकी शास्त्रज्ञ सी. आर. राव यांच्या संशोधनाचे मूल्य**

– विजय कोष्टी ---------------------------------------------------------- २७०

६४. **स्त्रीवादी चळवळ**

– कु. योगिता रामचंद्र रेवडे ---------------------------------------------- २७४

६५. **स्वातंत्र्य चळवळीत आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांचे योगदान**

– प्रा. रामदास रमेश वसावे ---------------------------------------------- २७७

६६. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर : महिला सक्षमीकरण विचार व सद्यस्थिती**

– १) मोनाली सिध्दार्थ लोंढे, २) प्रा. डॉ. संजय गायकवाड --------------------- २८१

६७. **दलित चळवळीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा सामाजिक दृष्टिकोनातून चिकित्सात्मक अभ्यास**

– १) रोशनी बाबुराव कांबळे, २) प्राचार्य डॉ.अशोक केशवराव सपाटे -------------- २८५

६८. **भारतीय इतिहासलेखन आणि सबाल्टर्न इतिहासलेखन परंपरा**

– १) डॉ. मल्लिकार्जुन बंदारे, २) डॉ. हाजी नदाफ ------------------------------- २९०

६९. **स्वातंत्र्यसैनिक डॉ. सत्यवती लिमये**

– प्रा. कल्याण जयसिंगराव चव्हाण ---------------------------------------- २९४

७०. **स्त्री – जीवनाचे विविध पैलू**

– १) डॉ. उज्वला पाटील, २) प्रा. डॉ. विश्वनाथ पवार, ३) डॉ. राजेंद्र सोनावले ----- २९८

७१. **इतिहासातील नवविचारप्रवाह दृष्टीकोन या संदर्भात वंचितवादी इतिहास लेखन प्रवाहाचे चिकित्सक परिक्षण**

– प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम -------------------------------------------- ३०२

७२. **ग्रामीण भागातील दुध व्यवसायाची भूमिका**

– १) एस. आर. कुंडले २) डॉ. पी. बी. पाटील ३) डॉ. ए.एस. कांबळे ----------- ३०६




Scanned with OKEN Scanner

ISSN No. 2394-5990

# महिला सक्षमीकरणा मध्ये 'मदर इंडिया' चित्रपटाचे योगदान

१) गडगे शांता रंगनाथ
संशोधक विद्यार्थी
इमेल : shantagadge@gmail.com

२) डॉ. के.एम. अंबाडे
मार्गदर्शक

संशोधन केंद्र
न्यू आर्ट्स,कॉमर्स अँड सायन्स कॉलेज.अहमदनगर.
फोन नंबर- ९७६६११८३८१.

मानवी समूहातील आत्मिक व भौतिक स्थित्यंतरांना अधिक सूक्ष्म व संवेदनशीलतेने प्रकट करणारी चित्रपट ही आधुनिक कला आहे.१९ व्या शतकाच्या अखेरीस औद्योगिक क्रांतीच्या कालखंडात लागलेल्या विविध महत्वपूर्ण शोधांपैकी यंत्राद्वारे नियंत्रित होणारी चित्रपट ही एक कला आहे. चलत चित्राद्वारे दर्शकांसमोर प्रतिमा प्रकट कारणे हे चित्रपटाचे मुख्य वैशिष्ट्य आहे.सर्जनशील असलेली ही कला बहुजन समाजाचे संवाद माध्यम असून लोकरंजन व लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे.चित्रपट निर्मितीचा सांस्कृतिक घटक व्यापक व बहुपदरी असल्याने रा. ग.जाधव 'चित्रपटाला समाजाची एक स्वायत्त संस्कृती मानतात' ३ मे १९१३ ला राजा हरिश्चंद्र या पहिल्या मराठी चित्रपटाचे प्रदर्शन मुंबईमध्ये झाले आणि त्यानंतर चित्रपट व्यवसायाचा विकास भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर झाला. राजा हरिश्चंद्र या चित्रपटांमध्ये तारामती ची भूमिका करण्यासाठी दादासाहेब फाळके यांना स्त्री कलाकार मिळाली नाही अगदी वेश्यावस्ती मध्ये जाऊ नये हि त्यांनी स्त्री कलाकार शोधण्याचा प्रयत्न केला परंतु चित्रपटांमध्ये काम करणे वेश्या व्यवसायापेक्षा हलक्या दर्जाचे समजले जात असल्याने राणी तारामतीचे पात्र करण्यासाठी एकही स्त्री कलाकार उपलब्ध न झाल्याने शेवटी पुरुषाला स्त्रियांचे कपडे घालून राणी तारामती चे पात्र उभे करण्यात आले. १९१३ मध्ये दादासाहेब फाळके यांनी ङ्गमोहिनी भस्मासुरफ या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटांमध्ये स्त्रियांचे पात्र करण्यासाठी कमलाबाई गोखले या तयार झाल्या आणि मोहिनी भस्मासुर या चित्रपटांमध्ये त्यांनी समाजाचा विरोध पत्करून भूमिका केली.

मदर इंडिया हा इ.स. १९५७ साली प्रदर्शित झालेला हिंदी भाषेतील चित्रपट होता. त्यातल्या आदर्शवादी भूमिकेमुळे चित्रपटाने प्रचंड यश मिळवलेच पण समाजमनावरही छाप ठेवली. याचे दिगदर्शन मेहबूब खान यांनी केले होते. चित्रपटाची कथाही मेहबूब खान यांनी लिहिली होती.. यात प्रमुख भूमिकांत नर्गिस , सुनील दत्त, राजेंद्र कुमार, राजकपूर हे होते. चित्रपटाला संगीत नौशाद यांनी दिले होते. तर गाणी लता मंगेशकर, शमशाद बेगम, महम्मद रफी, मन्ना डे यांनी गायली होती.हा चित्रपट भारतातर्फे ऑस्कर अ‍ॅकॅडमी पुरस्काराच्या विदेशी भाषा विभागासाठी पाठवण्यात आला होता. तो पुरस्कार हुकला असला तरी, ऑस्कर नामांकन मिळवणारा तो पहिला भारतीय चित्रपट होता. देश स्वतंत्र झाल्यानंतर मनोरंजन म्हणजे फक्त चित्रपट होते अशा त्या काळात १४ फेब्रुवारी १९५७ ला मेहबूब खान यांचा बहुचर्चित 'मदर इंडिया' चित्रपट प्रदर्शित झाला होता. ग्रामीण भारतातील कुटुंबाची कथा दाखवणाऱ्या या चित्रपटाला प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले. मी मदर इंडिया बघितला असे अनेक जण गर्वाने सांगत असत. आणि ज्यांनी पाहिला नसेल त्यांना आपण मोठी चूक केली असे वाटून तो चित्रपट पाहायला जात असे.

**उदिष्ट्ये :**

१. चित्रपटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेला मिळणाऱ्या प्रेरणा स्रोताचा उदय झाला.
२. चित्रपटाच्या कथानकाने वैचारिक प्रेरणा दिली.
३. मदर इंडिया चित्रपटा नंतर चित्रपटातील महिलांच्या भूमिकेचा दर्जा सुधारला.

**गृहीतके :**

१. भारताच्या ग्रामीण भागातील नवरा नसलेल्या स्रीयांच्या संघर्षपूर्ण जीवनाचे चित्रीकरण करण्यात आले.
२. नायिका प्रधान चित्रपट निर्मितीची मुहर्तमेढ रोवली. संशोधन पद्धती :- सदर शोधनिबंधासाठी प्राथमिक संदर्भ साहित्याबरोबर दुय्यम संदर्भ साहित्य, वर्णनात्मक लेख, वर्तमानपत्रातील लेख व अंतरजालातील माहितीचा वापर करण्यात आला आहे.



Scanned with OKEN Scanner

**मदर इंडिया चित्रपटाचे कथानक :**

कथानक राधा या स्त्रीभोवती फिरते. मेहबूब खान यांच्या मते ती स्वातंत्र्योत्तर काळातील आदर्श भारतीय स्त्रीचे प्रतिनिधित्व करते, म्हणून त्यांनी चित्रपटाचे नावही मदर इंडिया असे ठेवले. नवीन बांधून झालेल्या कालव्याचे उद्घाटन बुजुर्ग राधेच्या हस्ते होते हा चित्रपटाच्या सुरुवातीला प्रसंग. याचवेळी राधेला आपल्या आयुष्याचा प्रवास आठवतो. आणि तिची गोष्ट पडद्यावर साकारते.देशातील ७० टक्के जनता ग्रामीण भागात राहते. शेती हीच उपजीविका आणि तीसुद्धा पावसाच्या भरवशावर. पाऊस चांगला आला तरच शेतकऱ्याच्या

जुंपून शेत नांगरताना दिसतो. शेतकऱ्याची ही स्थिती १९५७ मध्ये मेहबूब खान यांनी ङ्गमदर इंडियाफ्मध्ये दाखवली होती. मदर इंडियाफ्त राधा नावाच्या ग्रामीण महिलेची कथा आहे. राधाच्या सासूने मुलाचे शामूचे लग्न करण्यासाठी गावातील सावकार सुखीलालाकडून कर्ज घेतलेले असते. परंतु कर्ज फेडले न गेल्याने सुखीलाला शेतपिकाचा एक तृतीयांश भाग आणि ५०० रुपये व्याज देण्यास सांगतो. याच दरम्यान शामूचे दोन्ही हात दगडाखाली येतात आणि तो अपंग बनतो. आपण कुटुंबासाठी काही करू शकत नाही हे लक्षात येऊन तो त्यांना सोडून जातो. पदरात दोन मुले बिरजू आणि रामू असलेली राधा सावकारा विरोधात उभी राहते. सुखीलाला तिच्याशी लग्न करण्याची इच्छा दर्शवतो परंतु ती तयार होत नाही. मुलांसाठी ती संघर्ष करते. स्वतः नांगराला जुंपून घेते. एक मुलगा गुंड झाल्याने शेवटी त्याला गोळ्या घालण्यासही मागे-पुढे पाहात नाही. भारतातील स्त्रियांचे इतके उत्कृष्ट चित्रण त्यापूर्वी कधीही झाले नव्हते. म्हणूनच ऑस्करसाठी हा चित्रपट पाठवण्यात आला. परंतु तेथील गोऱ्यांना भारतीय संस्कृतीची माहिती नसल्याने त्यांनी चित्रपट नाकारला. मात्र जगातील १०० सर्वोत्कृष्ट चित्रपटांमध्ये 'मदर इंडिया'चा समावेश करण्यात आला आहे.

**मदर इंडिया चित्रपटातून दिसणारी महिला सबलीकरणाची प्रक्रिया :-**

१. परंपरागत भारतीय स्त्रीयांच्या प्रतिमेला छेद दिला. पहिल्यांदा स्त्रीला नायक म्हणून दाखवले.
२. आपले अधिकार व अस्मिता यासाठी संघर्ष करणारी स्त्री प्रथम पडद्यावर दिसली.
३. सरंजामशाही प्रवृत्तीला विरोध करण्याची भावना तळागाळातील स्त्री वर्गामध्ये निर्माण झाल्याचे दिसते.
४. पतीने साथ सोडल्यानंतर प्रतिकूल परिस्थिती मध्ये खंबीरपणे उभी राहणारी स्त्री प्रथमच पडद्यावर दाखवण्यात आली.
५. गावामध्ये पूर आल्यानंतर गावकरी गाव सोडून जाण्याचे ठरवतात त्यावेळी नायिका त्यांना थांबवते. या प्रसंगात नायेकेची नेतृत्व क्षमता दिसून येते. आता पर्यंतच्या चित्रपटांमध्ये दुय्यम भूमिकांमध्ये स्त्रीयांच्या वैचारिकता, निर्णय क्षमता व्यक्त झाल्याचे दिसत नाही.
६. आजपर्यंत 'आई'पदाचे गौरविकरण करणाऱ्या चित्रपटाच्या ऐवजी पहिल्यांद्या वाट भरकटलेल्या मुलाला शिक्षा देणारी कणखर आई दाखवण्यात आली.
७. खांदयावर नांगर घेतलेले नर्गिसचे पोस्टर जागतिक पातळीवर भारतीय स्त्रीयांचा चेहरा बनले.
८. भारतातील जमीनदारी पद्धतीत स्त्रीयांचे होणारे मानसिक शोषण या चित्रपटात वास्तविक पद्धतीने दाखवले गेले.
९. नवऱ्याच्या अनुपस्थितीमध्ये भारतीय स्त्रीयांची होणारी दुर्दशा प्रथमच वास्तव पद्धतीने दाखवले गेले.
१०. गावामध्ये पूर येऊन गाव पूर्ण उद्धवस्त झाल्यानंतर सर्व गावकरी गाव सोडतात मात्र नायिका गाव सोडत नाही कारण आपला परागंदा झालेला नवरा परत येईल अशी तिला अपेक्षा असते. यात नायिकेची दुर्दम्य इच्छा शक्ती दिसून येते.
११. कर्तव्य आणि ममता यात फरक करणारी स्त्री प्रतिमा प्रथमच दाखवण्यात आली.
१२. चित्रपटामध्ये स्त्रीयांच्या त्याग. संघर्ष करण्याची जिद्द, आशावादी दृष्टिकोन, कर्तव्यनिष्ठता, स्वाभिमान या गुणांचे दर्शन होते.
१३. परिवारावर आलेल्या प्रत्येक संकटाच्या वेळेस जिद्दीनी उभी राहणारी, आपले स्त्रीधन अडचणीच्या वेळेस काढून देणारी स्त्रीची रूपे उत्कृष्टपणे दाखवली आहेत.

चित्रपटाचे 'मदर इंडिया' हे नाव केथरीन मेयो या ब्रिटीश लेखिकेने लिहलेल्या 'Mother India'(१९२७)नावाच्या पुस्तकावरून ठेवण्यात आले होते. या पुस्तकात लेखिकेने भारतीय संस्कृती, भारतीय पुरुषसत्ताक पद्धती, परंपरेने स्त्रियांचे समाजामध्ये असणारे दुय्यम स्थान या गोष्टीमुळे भारताला स्वातंत्र्य दिले जाऊ नये.असा सूर लावला होता. या पुस्त्काविरोधात महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लेखन करून यातील लेखिकेचे विचार कसे चुकीचे आहेत हे दाखवून दिले. मात्र चित्रपट दिग्दर्शक म्हणून मेहबूब खान यांनी दृश्य माध्यमाच्या द्वारे अतिशय उत्कृष्टपणे केथरीन मी मेयो यांना उत्तर देऊन भारतातील स्त्री कोणत्याही परिस्थितीमध्येन न डगमगता ध्येयाने सामोरी जाते हे दाखवून दिले.हा चित्रपट तयार करताना दिग्दर्शक मेहबूब खान यांच्यावर पर्ल एस बकयांच्या ञ्च्ह एरींह व ढ्ढह्श चींहश्ी या दोन पुस्तकांचा प्रभाव होता.



Scanned with OKEN Scanner

ISSN No. 2394-5990

२३ ऑक्टोबर १९५७ ला तत्कालीन राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद, पंतप्रधान पंडित नेहरू व इंदिरा गांधी यांच्या साठी चित्रपटाचे खास प्रदर्शन करण्यात आले. बॉम्बे स्टेटचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी हा चित्रपट मुंबई मध्ये करमुक्त केला. भारतातर्फे ऑस्करला जाणारा पहिला भारतीय चित्रपट म्हणून ओळखला जातो. अमेरिकेमध्ये चित्रपटाचे प्रदर्शन करणे व ऑस्कर साठी उपस्थित राहण्यासाठी दिग्दर्शक मेहबूब खान यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांचा अमेरिकेला उपस्थित राहण्याचा सर्व खर्च तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी केला. विदेशी भाषांमध्ये रूपांतरण करून सोव्हियत रशिया, ग्रीस, इजिप्त. लॅटीन अमेरिका, स्पेन, फ्रान्स इत्यादी देशांमध्ये हा चित्रपट दाखवला गेला. भारतासह जागतिक स्तरावर ८ कोटींची कमाई करणारा हा पहिला भारतीय चित्रपट होता. ५ फिल्म फेयर व २ राष्ट्रीय अॅवार्ड या चित्रपटाला मिळाले. इतिहासकार गर्ग यांनी अल्जिरीया इथे मदर इंडिया चित्रपट चालू असतना अरबदेशातील महिलांना अश्रू आवरणे कठीण होत होते अशी नोंद केली आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**


१. भारंबे.स.ना.- 'ग्रंथ चित्रपट समीक्षा', प्रशांत प्रकाशन, प्रथम आवृत्ती ७ मार्च २०१५.

२. मर्ढेकर बा सी.- 'कला आणि मानव', मौज प्रकाशन, प्रथम आवृत्ती, मार्च १९८३.

३. पाडळकर विजय.-'सिनेमाचे दिवस पुन्हा',मौज प्रकाशन, मुंबई, प्र, आ, २००५

४. पाडळकर विजय.- 'सिनेमायाचे जादुगार', मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई, प्र,आ.२०१०.

५. पाडळकर विजय.- 'सुहाना सफर', रोहन प्रकाशन,पुणे, प्र,आ, २०१८.

६. ठाकूर दिलीप.- 'सिनेमा मसाला मिक्स', नवचैतन्य प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १ जानेवारी २०१६.

७. टी शाशिधरण.- 'सिनेमाके चार अध्याय', वाणी प्रकाशन, पटना, प्रथम संस्करण, २०१४.


Scanned with OKEN Scanner

Education through self help is our motto - Karmaveer




Rayat Shikshan Sanstha's

# Shri. Raosaheb Ramrao Patil Mahavidyalaya, Savlaj

Tal.- Tasgaon, Dist.- Sangli-416 311(Maharashtra) Affiliated to Shivaji University, Kolhapur

(Accredited 'B+' Grade with CGPA - 2.72 in the Third Cycle of NAAC)



Indian Council of Social Science Research

Department of History & IQAC
in collaboration with
Shivaji University History Conference, Kolhapur

organizes
ICSSR, New Delhi Sponsored
Two Days National Level Seminar
on

## 'Subaltern Movements in India: Issues & Challenges'

18th & 19th January 2024

# Certificate

This is to certify that Prof./Dr./Mr./Ms. गडगे शांता रंगनाथ of न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अ.नगर has participated in the seminar as Key-note Speaker/ Resource Person/ Chairperson/ Participant. He/She has presented a research paper entitled महिला सक्षमीकरणा मध्ये मदर इंडिया चित्रपटाचे योगदान

Dr. S. V. Panade
Coordinator IQAC

Dr. S. B. Babare
Oraganizing Secretary

Prin. Dr. K. H. Shinde
Convener

Scanned with OKEN Scanner